# चैतन्य लहरी



अंक क्र. ३,४ मार्च/एप्रिल २०००

# शिवपूजा, पुणे ५ मार्च २०००









## • अनुक्रमणिका •


| अनु. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| (१) | शिवपूजा<br>पुणे ५ मार्च २००० | ३ |
| (२) | पुणे सार्वजनिक कार्यक्रम<br>पुणे ७ मार्च २००० | ६ |
| (३) | शेरे सहज-विद्यालय भूमिपूजन समारंभ<br>पुणे ३ मार्च २००० | ९ |
| (४) | मुंबई सार्वजनिक कार्यक्रम<br>मुंबई १२ मार्च २००० | ११ |
| (५) | सहज-समाचार | १४ |
| (६) | दिवाळी पूजा<br>कबेला (ग्रीस) १० नोव्हेंबर ९९ | १६ |
| (७) | पुणे सहज-आश्रम<br>पुणे ३ मार्च २००० | १९ |
| (८) | नवरात्री पूजा<br>कबेला १७ ऑक्टोबर ९९ | २१ |


**जितक्या लोकांना तुम्ही आत्मसाक्षात्कार द्याल तितकी तुमची शक्ती वाढत जाणार आहे. महाराष्ट्रातील सहजयोग्यांनी एकजूट पाळून प्रत्येकाने हजार लोकांना जागृती दिली पाहिजे.**

– प. पू. श्री माताजी निर्मलादेवी

शिवपूजा (पुणे ५ मार्च २०००)

# शिवपूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

## पुणे ५ मार्च २०००

आजची शिव-पूजा एका दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे. आजकाल सर्वत्र बिकट परिस्थिति आली आहे. नुसते रोजचे वर्तमानपत्र हातात घेतले तर सगळ्या बातम्या अंदाधुंद, खून-मारामाऱ्या, भ्रष्टाचार, अनैतिक घटना इ. प्रकारांबद्दलच जास्त नजरेस येतात; आणि माणूस सुन्न होऊन जातो. श्रीशिवांचे तांडव-नृत्य सुरू होण्याचा हा समय असावा असे वाटते; त्याच्याशिवाय तरणोपाय नाही असे वाटू लागते. विशेष म्हणजे शिवांचा क्रोध पार उफाळला तर त्यांतून कोण कसे वाचणार हे मला समजत नाही. प्रेम व करुणेचा सागर असले तरी त्यांचा राग विनाशकारी आहे. साऱ्या विश्वाचा संहार करण्याची शक्ति त्यांच्याजवळ आहे. जगभर विध्वंस चालवलेल्या, लहान बालकाचे रुप घेतलेल्या महाभयंकर राक्षसाचा त्याच्या पाठीवर उभे राहून शिवांनी वध केल्याची गोष्ट तुम्हाला माहित आहेच. त्याच्याच पाठीवर मग ते नृत्य करू लागले होते ही जग वाचवल्याच्या आनंदाची अभिव्यक्ति होती. त्याच अर्थाने जगांत सज्जन, धार्मिक, परोपकारी असल्याचा बहाणा करणाऱ्या सर्व राक्षसांना श्रीशिवच नष्ट करु शकतात; याची सुरुवात झालेली आहेच आणि ते आता अधिक झपाट्याने चालले आहे. म्हणूनच भूकंप, चक्रीवादळ, अपघात अशा अनेक घटना घडत आहेत. त्यामध्ये उत्थानाचेही कार्य मोठा जोर पकडत आहे. सत्याबरोबर असलेल्या लोकांना मात्र या परिस्थितीतही कसला त्रास वा नुकसान होणार नाही; त्यांचे सर्वतोपरी रक्षण होणार आहे कारण ते आईच्या कृपाछत्राखाली सुरक्षित आहेत.

म्हणूनच सहजयोग्यांसमोर हाच प्रश्न पडतो की त्यांनी इतर सामान्य लोकांबरोबर कसे राहायचे व त्यांना कसे वाचवायचे? यावर त्यांची कुण्डलिनी जागृत करणे हाच एक उपाय आहे. दुर्जन लोकांची कुण्डलिनी जागृत झाल्यास एक तर त्यांचा नाश होईल किंवा त्यांच्यात परिवर्तन होऊन ते सुधारतील; ते विनाशकारी मार्गापासून परावृत्त होतील. सगळ्यांच्या बाबतीत ते कदाचित यशस्वी होणार नाही. पण सहजयोगी नियमित ध्यान करुन समर्पित होण्याचा प्रयत्न करतील तर त्यांना कसलीही चिंता उरणार नाही. त्याचा तुमच्यापैकी अनेकांना अनुभव आलेला आहेच. त्यासाठी तुम्हाला स्वतःबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे व सहजयोगाबद्दल तुम्ही पूर्णपणे समर्पित झाले पाहिजे. इथे भारतातील सर्व प्रांतांमधून तसेच परदेशांतूनही अनेक सहजयोगी जमले आहेत. आजकाल सर्व देशांमध्ये अनेक विरोधी शक्ति कार्यान्वित झाल्या आहेत. म्हणून या विरोधी शक्तींच्या प्रभावापासून दूर नेण्यासाठी लोकांची कुण्डलिनी तुम्ही जागृत करणे फार आवश्यक आहे. तुम्ही सर्व सहजयोगी, तुमच्यामधील प्रत्येक जण हे करण्यास समर्थ आहे. ते करतांना लोकांना त्यांचे दोष दाखवण्याची, त्यांना कमी लेखण्याची, स्वतःचा संयम न सोडण्याची काळजी घेऊन शांतपणे तुम्हाला हे कार्य पार पाडायचे आहे. तसे झाले तर शिवांना त्यांचा तिसरा डोळा उघडून प्रकोप करण्याची वेळ येणार नाही.

त्यासाठी **तुम्ही प्रत्येकाने आपल्यामध्ये शिवतत्त्व प्रस्थापित केले पाहिजे. हे तत्त्व म्हणजेच आनंद, प्रेम व सत्य.** शिवांच्या सर्व संचारी शक्तीची लोकांना फारशी कल्पना नसते. उदा. शिवभक्त व विष्णुभक्त एकमेकांत भांडत बसतात. खरे तर विष्णुतत्त्वामधूनच उन्नत होत होत तुम्ही शिवतत्त्वापर्यंत पोचू शकाल. म्हणून ही दोन्ही तत्त्वे एकमेकांना पूरकच आहेत. म्हणून त्याबद्दल वाद असण्याची गरज नाही. **कुण्डलिनीचे उत्थान सुषुम्ना मार्गामधून होत असते; आणि हा मार्ग उन्नतीच्या प्रक्रियेमध्ये श्रीविष्णूंनीच तयार केला ओह, त्यातूनच तुम्ही शिवतत्त्वापर्यंत उन्नत होऊ शकणार आहात.** म्हणूनच तुमची चक्रे स्वच्छ होण्याला फार महत्त्व आहे. डावी-उजवीकडे न झुकता मध्यमार्गात व संतुलनांत राहणे फार महत्वाचे आहे. विष्णुतत्त्व शिवतत्वाबरोबर एकरूप झाल्यावरच अंतिम सत्य तुम्हाला समजणार आहे आणि शिवांच्या कमलचरणांपाशी तुम्हाला स्थान मिळणार आहे.

शिवांना सर्वजण मानतात. त्यांची पूजा करतात. पण शिवांचे गुण नीट लक्षात न घेतल्यामुळे बरेच लोक चुका करतात. शिवांचे विशेष स्वरूप म्हणजे आनंद. त्यांचा हा



आनंद सुक्ष्मातीसूक्ष्म असल्यामुळे सगळीकडे पसरलेला आहे. त्याचे आकलन होण्याची शक्ति मिळवल्याशिवाय तुम्हाला त्याचा अनुभव येणार नाही. मग तुम्ही आंतरबाह्य बदलून जाता. तसे लोकांना क्षुल्लक गोष्टींपासून आनंद मिळविण्याची सवय असते तर काही लोकांना स्वतःचाच घात करून घेण्यात कमीपणा वाटत नाही. पण आत्म्याचा, जो शिवांचेच प्रतिबिंब आहे, आनंद अगदी वेगळाच आहे. त्याचा हृदयालाच स्पर्श होतो. त्याशिवाय दुसऱ्या आनंदाच्या मागे लागणारे लोक हळूहळू विलयास जातात. पण शिव आपले सांत्वन करून आपल्याला शांति व आनंद देणारे आहेत. म्हणून कुण्डलिनीच्या उत्थानामधून आपण विष्णुतत्त्वाकडून शिवतत्त्वापर्यंत पोचू शकतो व सत्यापर्यंत येऊ शकतो. त्याची जाणीव तुम्हाला हातांच्या बोटांवर समजू शकते; अर्थात त्याच्यामध्ये असत्याचा जराही अंश नसतो. हे कुण्डलिनीचेच वरदान आहे. कुण्डलिनी तुमची सर्व चक्रे स्वच्छ करत तुमच्या टाळूवर स्थिरावते ही शिवांचीची कृपा आहे आणि श्रीविष्णूच ते घडवून आणतात.

आजकाल जगामध्ये पैशाचा प्रभाव फार वाढला आहे. पैशासाठी लोक वाट्टेल ते करायला मागे पुढे पहात नाहीत. सहजयोगातही हे प्रकार चालतात. ही एक विकृति आहे. तशा इतरही विकृति आहेत आणि या सर्व विकृतींचे निरसन फक्त कुण्डलिनीच करू शकते. जोपर्यंत तुम्ही ध्यानधारणा करुन कुण्डलिनीला आत्मसात करुन पूर्णपणे तिचे उत्थान करत नाही तोपर्यंत अंतिम सत्य साध्य करू शकत नाही व शांति आणि आनंदाचा अनुभव मिळवू शकत नाही. काही लोक हे करतांनाही पूर्वीच्या सवयी, धारणा, समजुती विसरू शकत नाहीत व त्यांच्या आहारी जातात. हे त्यांच्या प्रगतीला अडथळा आणते. जे लोक ध्यान करतात पूजेला येतात ते सतत प्रगति मिळवू शकतात. म्हणून आपले ध्येय लक्षात ठेऊन त्यापासून कधीही विचलित न होण्याची खबरदारी तुम्ही घेतली पाहिजे. म्हणून पूजा व ध्यान यांना महत्त्व आहे. त्याचबरोबर आपण आपल्या हृदयांत सहजयोग पूर्णपणे सामावून घेतला आहे की नाही इकडेही तुम्ही लक्ष ठेवले पाहिजे. मी बरेच वेळा पाहते की काही सहजयोगी उत्तम प्रगति करुन उच्च स्थितीला येतात पण नंतर तेहि घसरु लागतात. याला कारण म्हणजे पूर्वीच्या काही सवयी पुन्हा डोक वर काढू पाहात आहेत हे त्यांच्या लक्षांत येत नाही. म्हणून तुम्ही या बाबतीत अत्यंत सावधानपूर्वक जागरुक राहिले पाहिजे. आपण सहजयोगाशी पूर्ण प्रामाणिक आहोत का याचे आत्मपरीक्षण सतत करत राहिले पाहिजे; पैसा कमावण्यासाठी सहजयोगांत राहण्याची प्रवृत्ति फार हानीकारक आहे. असे सर्व दृष्टींनी स्वतःकडे लक्ष ठेवले पाहिजे. **म्हणून सहजयोगाचे कार्य, स्वतःची ध्यान-धारणा यामधून स्वतःचे व्यक्तिमत्व उच्च स्तरावर कसे येईल, आदर्श कसे बनेल याची काळजी घेणे सर्वात चांगले.** त्यांतूनच समष्टीरुपामध्ये तुम्ही उतरु शकाल. सहजयोगामध्ये अधिकार, नाव, पैसा इ. गोष्टी दुय्यम आहेत; सहजतेत येण्यासाठी त्यांचा अजिबात उपयोग नाही व जरुरीही नाही. त्यांच्या मागे लागलात तर कधी व कसे खाली पडाल याचा भरवसा नाही म्हणून सर्वांनी सांभाळून रहा व उच्च व्यक्तिमत्व बनण्याकडे लक्ष द्या.

आणखी एक गोष्ट म्हणजे **जितक्या लोकांना तुम्ही आत्मसाक्षात्कार द्याल तितकी तुमची शक्ति वाढत जाणार आहे.** नाही तर जे मिळवले ते बेकार जाईल. एका दिव्याने दुसरा दिवा पेटवला तरी पहिल्या दिव्याचा प्रकाश कमी होतो असे होत नाही. तसेच हे आहे. जो सहजयोगी प्रेमपूर्वक व अंतःकरण उघडून सहजयोग सांगतो तो खरा सहजयोगी. तुम्हाला साऱ्या मानवजातीचे परिवर्तन घडवण्यासाठी हे केलेच पाहिजे. साऱ्या जगभर परमेश्वराचे सुंदर साम्राज्य व्हावे ही शुद्ध इच्छा बाळगून तुम्ही कार्य केले

पाहिजे. कित्येक वेळा अगदी साधारण दिसणाऱ्या सहजयोग्यांनाही चमत्कार वाटावा असे अनुभव आलेले मी पाहते. कारण इच्छा शुद्ध असली की कुण्डलिनी कार्यप्रवण होते. म्हणून सहजयोग सांगण्याचे, कुण्डलिनी जागरणाचे कार्य तुम्हाला केलेच पाहिजे. तुम्हाला सहजयोग मिळाल्याचे हे महत्त्व तुम्ही समजून घेतले पाहिजे व त्याचा प्रसार केला पाहिजे.

महाराष्ट्राबद्दल बोलायचे म्हटले तर अवघडच वाटते. थोर परंपरा असलेल्या महाराष्ट्राची आजची दशा पाहिली म्हणजे दुःख होते. इथले लोक कर्म-काण्ड व पूजा-अर्चा करण्यातच गुंतले आहेत. घरोघरी खंडीभर देव, नाही तर कुठल्या ना कुठल्या गुरुपाठीमागे लागणे हाच प्रकार दिसून येतो. इतका सर्व खटाटोप करुन पदरात काय पडले हे बघायला हवे. तेव्हा सगळे सोडून 'स्व'तःबद्दल विचार करावा आणि कुण्डलिनी जागृत करुन त्या कार्याला लागले पाहिजे. तुमच्या कुण्डलिनीकडूनच कार्य होणार आहे. माझा जन्म महाराष्ट्रातलाच पण माझ्या कार्याला उत्तर भारतातून जेवढा प्रतिसाद मिळतो तेवढा महाराष्ट्रात मिळत नाही. तिकडच्या खेड्यापाड्यातही सहजयोग खूप पसरला आहे. पण महाराष्ट्रात संतांनी एवढे प्रचंड कार्य करून ठेवले असले तरी इथे सहजयोग फारसा फोफावला नाही. म्हणून **महाराष्ट्रातील सहजयोग्यांनी एकजूट पाळून प्रत्येकाने हजार लोकांना जागृति दिली पाहिजे.** इथे तर साऱ्या जगाची कुण्डलिनी बसली आहे. अष्टविनायक आहेत, देवीची साडे तीन पीठे आहेत. तरीही इथले लोक कमी पडण्याचे कारण म्हणजे इथल्या लोकांचा दांभिकपणा व नसती उठाठेव करण्याची सवय. त्यापेक्षा सत्य समजून घ्या, त्याच्या मागे लागा. बाहेरच्या देखाव्याला किंमत नाही तर तुमच्या आंतमधील संपत्तीला महत्त्व आहे आणि त्या संपत्तीचा सुगंध विश्वभर पसरेल असे तुमचे व्यक्तिमत्त्व बनले पाहिजे. क्षुल्लक गोष्टींवर चर्चा, आपापसातील भांडणे व वाद संपले पाहिजेत. पण इथली युवाशक्ती आता चांगल्या स्थितीत आली आहे व त्यांच्याकडून महाराष्ट्र बदलेल असे वाटते. गर्विष्ठपणा सोडून आम्ही सहजयोग वाढवू असे ब्रीद धरले पाहिजे. आजच्या शिवरात्रीच्या शुभ दिवशी तुम्ही अशी प्रतिज्ञा केलीत तर शिव प्रसन्न होतील; त्यामुळे तुमच्या हृदयात आनंद ओसंडून जाईल. म्हणून तुम्ही आधी पूर्णपणे प्रकाशात आले पाहिजे तरच दुसऱ्यांना अंधारातून बाहेर काढाल. म्हणून पुढील वर्षात तुमच्यापैकी प्रत्येक जणाने कमीत कमी शंभर लोकांना जागृति देणार अशी प्रतिज्ञा करा. इथले लोक जादा बुद्धिवादी असल्यामुळे सहजयोग एकदम स्वीकारणार नाहीत पण त्यांना खरा फायदा कशामधून मिळणार आहे हे नीट समजावून सांगितले तर त्यांचा विश्वास बसेल. मग बुकीच्या मार्गावरुन परावृत होऊन लोक हळुहळु इकडे वळतील. हे प्रत्येकाचे परमकर्तव्य आहे आणि त्यात तुम्ही अग्रेसर व्हायला पाहिजे. अनेक संत-साधू, शिवाजी महाराज इ. थोर लोकांनी इथे रक्त सांडले आहे. म्हणूनच लोकांची तोंडे आधी इकडे वळली पाहिजेत. सत्तेसाठी मारामारी भांडणे, दारु इ. गोष्टी थांबल्या पाहिजेत. महाराष्ट्र पुण्यभूमि मानली जाते. तेव्हा **खऱ्या अर्थाने ते महा-राष्ट्र बनेल असे कार्य इथे झाले पाहिजे.** लोकांना प्रेमाने, कळकळीने समजावून सांगण्याची गरज आहे. म्हणून हे सर्व आजच्या शिवपूजेच्या दिवशी तुम्हाला आग्रहाने सांगत आहे. शिव जर रागावले तर त्यांचा राग सर्वप्रथम महाराष्ट्रावर निघणार आहे. शिव हे श्रीगणेशांचेही आराध्यदैवत आहेत म्हणून श्रीगणेश जर रागावले तर महाराष्ट्राचे काय होईल सांगता येत नाही. अनीतिमान वर्तणूक व श्रीगणेशांची मूर्ति ठेऊन त्यांचीच विटंबना करणे हे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. म्हणून अशा लोकांना ठिकाणावर आणण्याचे काम तुम्हा सहजयोग्यांनीच करायचे आहे.

**आजच्या शिवपूजेच्या पवित्र दिवशी तुम्ही प्रत्येकाने निश्चय केला पाहिजे की आम्ही महाराष्ट्रात सहजयोग खूप जोराने पसरवण्याची पराकाष्ठा करु.** त्या कार्याला तुम्ही लागले पाहिजे. तसेच ध्यान पण केले पाहिजे. ध्यान नसेल तर कशाचा काही फायदा नाही, नुसते इथे येऊन भजने म्हणण्यात, ध्यान होत नसेल तर काही अर्थ नाही. कारण ध्यानामधूनच तुमचे व्यक्तिमत्त्व अंतरमनापासून सुधारणार आहे. श्री शिवांना प्रसन्न करून घेण्यासाठी जास्तीत-जास्त लोकांना जागृति द्या. बेकार गोष्टींमध्ये वेळ न घालवता कुण्डलिनी (जी शिवांची शक्ति आहे) जागरणाचे कार्य करा. आजच्या पूजेमध्ये शिवांना हृदयांत प्रस्थापित करा. तेच आत्मा आहेत व त्यांच्याच कृपेने सर्व होणार आहे. तुमचे भले होण्यासाठी तुम्ही सहजयोगांत पूर्णपणे उतरले पाहिजे. हीच माझी सर्वांना प्रेमाची विनंती आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद!

●

# पुणे सार्वजनिक कार्यक्रम

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### पुणे ७ मार्च २०००

सत्याच्या शोधात असणाऱ्या सर्व साधकांना नमस्कार.

आजकाल जगभर सत्याचा शोध अनेक मार्गांने चालला आहे; पण अजून त्या लोकांना सत्य समजलेले नाही. म्हणून सत्य शोधण्याच्या प्रयत्नात लोक भांबावून गेले आहेत. या भारत देशांत ही स्थिति त्या मानाने बरी आहे पण बाहेरच्या देशात हा विचार फार गंभीरपणे चालला आहे. रोजचे साधे वर्तमान पत्र पाहिले तरी खून, मारामाऱ्या, फसवणूक अशाच बातम्या नजरेस येतात; भ्रष्टाचाराबद्दल तर बोलायलाच नको. याचे कारण हेच आहे की आपल्याला मानवजन्म मिळाला, शरीर व बुद्धि मिळाली त्यापाठीमागचा उद्देश काय असावा हा महत्त्वाचा विचार लोक करत नाहीत. म्हणून शरीराने व बुद्धिने माणूस चुकीच्या मार्गाकडे धावत आहे. थोडासा जरी विचार केला तर हे सर्व ठीक करण्याची, सुधारण्याची काही तरी व्यवस्था परमेश्वराने माणसामध्येच करुन ठेवली असली पाहिजे, या परमेश्वराला आपण निर्माण केलेला मानव अधोगतीला चालल्याचे कधीच पाहवणार नाही. म्हणून अशी कोणती व्यवस्था आहे इकडे दृष्टि गेली पाहिजे. चुकीच्या मार्गाने चाललेले लोक स्वतःबरोबर समाजाचेही नुकसान करत आहेत. परिणाम म्हणून माणूस स्वतःची प्रतिष्ठा, गौरव व अभिमान गमावून बसतो. निर्लज्ज बनत जातो. चांगले वागून काय मिळणार असे म्हणणारे लोक पुढे येतात. पण ह्यांत काही नवीन नाही. भ्रष्टाचार, अनैतिकता, इ. ला तर आजकाल काहीच मर्यादा राहिलेली नाही. म्हणूनच आता विचार असा करायला हवा की परमेश्वराने माणसाला असे वागण्याचे स्वातंत्र्य का बरे दिले असावे? त्याचा उद्देश हाच आहे की माणूस कधीतरी प्रगल्भ व प्रबुद्ध होऊन जागृत होईल आणि त्याला सर्व समजेल. त्यासाठीच परमेश्वराने माणसामध्ये जन्मतःच एक शक्ति प्रस्थापित करून ठेवली आहे. आणि त्या शक्तीलाच कुण्डलिनी म्हणतात. ही कुण्डलिनी आपल्या माकड हाडामध्ये साडेतीन वेटोळे घालून बसलेली आहे.

आपल्या संस्कृतीमध्ये कुण्डलिनीबद्दल पुरातन काळापासून उल्लेख केला गेला आहे. हे पण सांगून ठेवलेले आहे की ही कुण्डलिनी जागृत झाल्यावर माणूस एका विशेष व उच्च स्तरावर येतो. माणसाच्या उत्क्रांतीसाठीच ही प्रक्रिया होणार असल्यामुळे कुण्डलिनी जागृत झाल्यावर माणसामध्ये संपूर्ण आंतरिक परिवर्तन घडून येते. क्षणभर विचार करावा की आजकालच्या राजकारणी व पुढाऱ्यांमध्ये असे परिवर्तन झाले तर किती चांगले होईल? मग लोकांचे सर्व प्रश्नच – मग ते शैक्षणिक, आर्थिक, कृषि उत्पादन इ. कुठल्याही क्षेत्रामधील असोत संपून जातील. माणसा-माणसामध्ये व कुटुंबामध्ये सुख-शांति येईल व सुंदर समाज बनेल. दुसरी गोष्ट म्हणजे आज सर्वजण सत्तेच्या मागे लागले आहेत आणि त्यांना समजत नाही की जोपर्यंत माणूस स्वतःवर सत्ता मिळवत नाही तोपर्यंत त्याला खुर्ची मिळून काय होणार? दुसऱ्याचे तो काय भले करणार? ही स्वतःवरची सत्ता प्राप्त करायची असेल तर माणसाला आत्मसाक्षात्कारच मिळाला पाहिजे; तसे झाल्यावरच माणसाला मानव-जन्माचा, शरीर, मन, बुद्धि, अहंकार यांचा कसा सदुपयोग करायचा हे समजणे शक्य होते. तुमच्यामध्येच परमेश्वराने करून ठेवलेली ही सर्व व्यवस्था तुम्ही जाणून घेतली तर तिची महति पाहून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. शिवाय कुण्डलिनी जागृत करून घेण्यासाठी तुम्हाला

पैसे मोजावे लागत नाहीत. एखाद्या बीला अंकुर फुटणे हे जितके स्वाभाविक आहे तितकी सहज घटित होणारी ही घटना हे एक जिवंत कार्य आहे. म्हणूनच एखाद्याची कुण्डलिनी जागृत झाली तर तो दुसऱ्या अनेकांची कुण्डलिनी जागृत करू शकतो. काही लोकांना वाटते की कुण्डलिनी जागरणामुळे साधकाला अनेक त्रास होतात; पण मी हे कार्य गेले तीस वर्षे करत आहे आणि असा कसलाही त्रास कुणालाही आजपर्यंत झालेला नाही. कुण्डलिनी जागृतीचा हा दुर्मिळ अनुभव तुम्हाला आज इथेच मिळणार आहे.

कुण्डलिनी जागृत होऊन जेव्हा वर येते तेव्हा तुमच्यामधील सर्व सूक्ष्म चक्रे सुधारतात, सक्षम बनतात; त्यातून तुम्हाला त्याचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक असे अनेक फायदे मिळतात. तुमचा आत्मा तुमच्या चित्तामध्ये प्रकाशित होतो आणि त्यामुळे तुमचे चित्त जिथे जाईल तेथे ते कार्यान्वित होते. एवढी सर्व शक्ति तुमच्यामध्ये असूनही जर तुम्ही त्याबद्दल अनभिज्ञ राहिलात तर त्यात परमात्म्याचा दोष नसून ते तुमचे अज्ञान (अंधःकार) आहे असे म्हणावे लागेल. कुण्डलिनी जागृत होऊन टाळूवरील ब्रह्मरंध्रामधून बाहेर आली की सगळीकडे पसरलेल्या परमेश्वराच्या सर्वव्यापी शक्तीमध्ये मिसळते व त्या परमचैतन्याशी एकरूप होते. तीच शक्ती मग तुमच्या बुद्धीमधून कार्य करु लागते ज्यामुळे तुमची बुद्धि सुबुद्धि बनून जाते. त्यालाच आइनस्टाईनने शास्त्रज्ञांच्या भाषेत Torsion Area असे म्हटले. हा संबंध झाला की सत्याबरोबर असल्यामुळे तुम्ही फक्त सत्यच जाणता आणि म्हणून त्यामध्ये काही चूक होण्याची शक्यता नाही. अशा तऱ्हेने सत्यामध्ये तुम्ही त्रिभोर होऊन जाता. हे सत्य साऱ्या सृष्टीमध्ये पसरून राहिले आहे; हे सत्य म्हणजेच प्रेम, कारण सत्यामध्ये प्रेमाशिवाय दुसरी काही गोष्ट वा भावना नसतेच. आता हेच घटित होण्याचा समय आला आहे.

महाराष्ट्रात मला थोडे मराठीतूनही बोलले पाहिजे. तशी मराठी एक समृद्ध भाषा आहे, सहजयोग सांगण्यासाठी मराठीसारखी दुसरी भाषा नाही. पण त्याचा हट्ट न धरता प्रत्येकाने हिंदी ही राष्ट्रभाषा असल्यामुळे शिकलीच पाहिजे.

आज आपल्या देशाचे तुकडे झाले आहेत; देशभक्तीची जाणीव उरलीच नाही अशी शंका येते. जिकडे पहावे तिकडे प्रत्येक जण पैशाच्या मागे धावत आहे. पण पैसा कितीही असला तरी तो माणसाला सुख देईलच असे नाही; उलट पैसा आला की पाठोपाठ दारुसारखी व्यसने पण येतात. लक्ष्मी चंचल असल्यामुळे पैसा मिळालेला माणूस संतुलन गमावून बसतो. त्यामुळे तो आनंदाला पारखा होतो. आनंदाला प्रतिशब्द किंवा विरोधी शब्द नाही, तो केवळ आनंद असतो. ज्ञानेश्वरांनी त्यालाच 'सोनियाचा दिवस' असे म्हटले. तोच समय आता आला आहे. पण तुम्ही थोडेसे तरी सूक्ष्माकडे लक्ष दिले नाही तर हे कसे होणार? या महाराष्ट्रात अनेक साधुसंतांनी खूप कार्य केले आहे. मेहनत घेतली; इतके साधु-संत उत्तर भारतातही झाले नाही. पण या उत्तर भारतात सहजयोग जितका जोराने पसरला तितका महाराष्ट्रात रूजला नाही. म्हणून वाटते की महाराष्ट्राची पुण्याई कुठे गेली? म्हणून आपल्याकडे जे दोष आहेत ते समजून घेतले पाहिजेत.

एक म्हणजे इथे लोक कर्म-काण्ड, देवपूजा इ. मध्येच अडकले आहेत. घरा-घरामध्ये खंडीभर देव व त्यांच्या पूजेत खूप वेळ घालवतात. नाहीतर देवळांत जायचे, लांबच्या लांब रांगांत तासन् तास उभे रहायचे; नाही तर पंढरपूरच्या वारीला जायचे! इतके सारे करून खरा देव ओळखता आला का? कुठल्या मंदिरात वा मूर्तीमध्ये देव जागृत आहे हे ओळखता आले का? म्हणून हे सर्व आता सोडून दिले पाहिजे. पुणे हे पुण्यपटनम् म्हणून ओळखले जायचे म्हणून तर मीहि इथे आले. तेव्हा मला कुणीतरी सांगितले की पुणेकर म्हणजे भामटा. मला तेव्हा आश्चर्य वाटले की पुण्याची ती पुण्याई व सात्विकता कुठे लोप पावली? म्हणून महाराष्ट्राचे नाव सार्थक करण्यासाठी प्रत्येक सहजयोग्याने इथल्या लोकांची कुण्डलिनी जागृत करण्याचा पण

घेतला पाहिजे. मी सुद्धा खूप वर्षापासून अगदी खेड्यापाड्यात जाऊनही खूप प्रयत्न केले. म्हणून या लोकांच्या डोक्यात बसलेली खुळ काढण्यासाठी त्यांना आत्म साक्षात्कार मिळवण्याची महति समजावून सांगितली पाहिजे आणि त्याची अनुभूती त्यांना मिळाली पाहिजे. या अनुभूतीलाच आदि शंकराचार्यांनी 'स्पंद' हे नाव दिले व त्याचे वर्णन केले, त्यालाच आम्ही व्हायब्रेशन्स म्हणतो. ते स्पंद तुम्हाला जाणवले की तुमचे, तसेच दुसऱ्याचे कोणते चक्र पकडलेले आहे हे तुम्हाला समजते. तसेच तुम्ही ते ठीकही करू शकता. पण त्यांचे हे अमोल ज्ञान ग्रंथांतच ठेवले गेले व ग्रंथ पठणालाच महत्त्व दिले गेले.

दुसरी एक अडचण म्हणजे इथले स्वतःला बुद्धिवादी म्हणवणारे लोक. पण हे आत्म्याचे ज्ञान बुद्धीच्या पलीकडचे आहे. बुद्धि वापरुन सत्य मिळण्यासारखे नाही. त्यासाठी कुण्डलिनीच जागृत झाली पाहिजे, त्यासाठी तुम्हाला पैसाही खर्च करायला नको, फक्त त्यासाठी तुमची इच्छा शुद्ध असली पाहिजे, सत्य मिळविण्याची शुद्ध इच्छा हवी. म्हणून स्वतःच्या स्वार्थासाठी तुम्हाला खोटे-नाटे सांगून निवृत्तीमार्गी झाल्याशिवाय हे होणार नाही अशा चुकीच्या गोष्टी सांगून तुमची फसवणूक करणाऱ्या भोंदू लोकांपासून सावध रहा. तसे पाहिले तर महाराष्ट्रातले लोक मुळातच निवृत्तिमार्गी आहेत. इथली अस्मिताच मुळांत निवृत्तिमार्गी आहे. कारण साधुसंतांचा आदर ही इथली परंपरा आहे. पण काळाच्या ओघात त्यालाही फाटे फुटले आणि पूजा-उपास-भजन यातच धर्म आहे असे लोक समजू लागले. हे उपयोगाचे नाही, त्यातून काही मिळणार नाही. म्हणून आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घ्या आणि इतरांनाही ते द्या म्हणजे ते वाढेल येथील सहजयोग्यांचे तेच मुख्य कार्य आहे. षड्रिपूंच्या बंधनातून सुटका करून घेण्याचा आत्मसाक्षात्कार मिळवणे, स्वतःचे 'स्व'रुप ओळखणे हाच एकमेव मार्ग आहे. काही सोडायची जरुर नाही. हे करू नका, ते करू नका. इ. मी सांगण्याचीही जरूर नाही. मी तसले काही सांगतच नाही कारण प्रकाशात आल्यावर ते तुमचे तुम्हालाच समजणार आहे.फक्त जागृति घ्या व मग बघा एवढीच मी विनंती करते. सहजयोगांत आल्यावर अनेक लोक सुधारल्याचे, त्यांची व्यसने सुटल्याचे तुम्हाला दिसेल. मी इतकी वर्षे हेच काम करत आहे, सहजयोग खेड्यापाड्यापर्यंत पोचला पाहिजे. म्हणजेच महाराष्ट्राला गमावलेला लौकिक व प्रतिष्ठा परत मिळणार आहे. माझी तशी खात्री आहे. सहजयोगात आल्यावर स्पंद, हातावरचे चैतन्य, चक्रे व त्यांची स्थिती आणि सुधारणा सर्व काही तुम्हाला समजेल व तुम्ही सहजावस्था मिळवाल. बुद्धिवाद्यांकडे लक्ष देऊ नका, वाद-विवाद करत बसू नका; बुद्धि ठीक असती तर आपली अशी वाईट दशा झालीच नसती. नुसता ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभव वाचला तरी पुरे, त्यात हेच सांगितले आहे. पण हे कुणाला सांगणार व कोण ऐकणार? बुद्धीमध्ये चमक आणायची असेल तर तिच्यात आत्म्याचा प्रकाश आला पाहिजे. तुमच्यामध्ये सर्व व्यवस्था करून ठेवलेली आहे. फक्त हे यंत्र चालू करायचीच जरूर आहे आणि तीच वेळ आता आली आहे. आपल्याला महाराष्ट्र, समाज आणि जग सुधारून सगळीकडे सुख-शांतीचे साम्राज्य आणायचे आहे म्हणून प्रत्येकाने आत्मसाक्षात्कार मिळवून इतरांना तो द्यायचा आहे. त्यासाठीच तुम्ही या पुण्यभूमीत जन्माला आला आहात. याच पुण्यकार्याची आज फार गरज आहे. म्हणून मी सर्वांना प्रेमाचा आग्रह करते की आत्मसाक्षात्कार घ्या, त्याची अनुभूती घ्या आणि इतरांना देत चला.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

# शेरे सहज-विद्यालय

## भूमिपूजन समारंभ

## पुणे ३ मार्च २०००

प. पू. श्री माताजींचा बरेच दिवसांपासून महाराष्ट्रात सहजयोग शिक्षण-संस्था सुरू करण्याचा मनोदय ता. ३ मार्च, २००० या दिवशी शेरे येथे यथासांग भूमिपूजनापासून कार्यान्वित झाला. शेरे येथील विश्वनिर्मल धर्माची ट्रस्टची जागाच या प्रकल्पासाठी मुक्रर केली गेली व हा शुभ समारंभ त्या जागीच भारतीय व परदेशी सहजयोग्यांच्या समवेत व प. पू. श्री माताजींच्या उपस्थितीत सुंदर रीतीने साजरा झाला.

समारंभासाठी शानदार प्रशस्त मंडप उभारला होता व सहजयोगी बंधु-भगिनी उत्साहाने एकत्र जमले होते. प. पू. श्रीमाताजींच्या आगमनानंतर स. ११ वा. समारंभास सुरुवात झाली. सर्व प्रथम पुण्याचे जिल्हाधिकारी श्री. गौतम यांनी प्रास्ताविक केले. भारतीय संस्कार व संस्कृतिमूल्यांच्या आधारावर उभ्या असणाऱ्या व सहजयोग संकल्पनेवर आधारित शिक्षण-संस्थांमधूनच भविष्यात आदर्श नागरिक निर्माण करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व त्यांनी विशद केले. लहानपणापासूनच असे शिक्षण देण्याचे ध्येय राबवणाऱ्या या संस्थेला प. पू. श्रीमाताजींचेच आशीर्वाद असल्यामुळे सर्व जगातील सहजयोगी उत्साहाने हातभार लावतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर सर सी. पी. श्रीवास्तवसाहेबांनी छोटेसे पण प्रभावी भाषण केले. त्यात मुख्यता श्री. माताजींचे हृदय जगभरातील गरीब लोकांविषयींच्या करुणेने कसे ओथंबलेले आहे आणि त्यांना वर काढण्याची व उन्नत मानव बनवण्याची त्यांना किती तळमळ त्यांना वाटते हे सांगून या प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या.

**त्यानंतर आपल्या भाषणात प. पू. श्रीमाताजी म्हणाल्या,** "महाराष्ट्रात शाळा काढण्याचे माझ्या मनात बरेच दिवसांपासून घोळत होते. ही सुरुवात आज इथे होत आहे याचा मला फार आनंद होत आहे. ही जागा इतकी सुंदर झाली असेल याची मला कल्पना नव्हती. ही जागा निसर्गरम्य आहे. निसर्गात सगळीकडे व्यवस्था असते, मर्यादा असते. माणूस निसर्गासारखा झाला तर चांगले होईल, पण त्याला परमेश्वराकडून जी मुक्तता मिळाली आहे त्या मुक्ततेमध्ये तो वाहवत गेला आहे. या शेरे गावातील लोकांनीही आम्हाला सुरुवातीला खूप त्रास दिला व अडथळे आणले. पण त्या लोकांकडे बघूनच मला लहान मुलांसाठी शाळा काढावी असे वाटू लागले. म्हणजे अशा शाळांमधून पुढे आदर्श नागरिक निर्माण होतील. लोकांमध्ये सर्वप्रथम देशभक्ति रुजली पाहिजे. ती नसेल तर कोणतेच कार्य नीट होणार नाही. मातृ-पितृ भक्तीबरोबरच देशभक्ती नसेल तर माणूस व्यर्थ गेला म्हणायचे. ही देशभक्ती वाढवायला हवी. मुलांना टिळक, गांधी या थोर लोकांबद्दलही नीट माहिती नाही. आजकालचे लोक तर वाट्टेल तसे वागतात. त्यांच्या तऱ्हा पाहिल्यावर या पुण्याचेच पूर्वीचे नाव



पुण्यपटनम् असेल का असे वाटते. मी पुण्यात स्थायिक झाले तेव्हा इथला मवालीपणा पाहून मला पुण्याचीच नाही तर सबंध महाराष्ट्राची काळजी वाटू लागली. म्हणून हा उपक्रम सुरू होत आहे यचा मला फार आनंद वाटत आहे. इथे शिकणाऱ्या मुलांना काही विशेष करून दाखवता येईल. त्यांच्या कुटुंबात सारे वाईटच लोक असल्यामुळे इकडच्या मुलांना चांगले वळण नाही, कसली बंधने नाहीत. राजकारणात व समाजात आपल्याला आज चांगल्या लोकांची गरज आहे. इथून शिकून बाहेर पडलेली मुले चांगले व आदर्श नागरिक बनतील अशी ही शाळा बनली पाहिजे. म्हणून ही सारी धडपड आहे. इथे भारतातील मुलांनाच ठेवण्याची माझी इच्छा आहे. परदेशी मुलांसाठी दुसरी सोय आहेच व त्या शाळांतील परदेशी मुले इतकी चांगली बनल्याचे पाहूनच मला आपल्याकडील मुलांसाठी काहीतरी केले पाहिजे असे वाटत होते. इथल्या मुलांना चांगले वळण पाहिजे, त्यांना इमानदारी समजली पाहिजे, तरच ते देशभक्त बनतील. देशभक्तीमध्ये बेइमानदारी चालत नाही. आपल्याला शुद्ध, पवित्र व आदर्श नागरिक तयार करायचे आहेत. इथल्या शाळांमधून बाहेर पडणारी मुले असे आदर्श नागरिक बनण्याची क्षमता मिळवतील अशी मला आशा आहे. मुलांमध्ये शक्ति-मूल्ये रुजवली गेली पाहिजेत. मूल्ये नसतील तर कार्य होणार नाही. इथले सर्व सहजयोगी मला मदत करतील आणि आपण एक आदर्श शाळा उभी करावी अशी माझी इच्छा आहे. सहजयोग त्यासाठीच आहे. स्वतःसाठी नाही तर सर्व मानवजातीसाठी तो आपल्याला मिळाला आहे आणि त्यासाठीच ही शाळा सुरू करायची आहे. प्रत्येक सहजयोग्याने निष्ठा बाळगून तन-मन-धन अर्पून या कार्याला लागावे अशी माझी सर्वांना प्रेमाची विनंती आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद

# शेरे सहज-विद्यालय
## आर्थिक सहाय्य : आवाहन

कार्यक्रमानंतर संयोजकांनी उपस्थित सहजयोग्यांना शाळेच्या उपक्रमासाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. त्याला विनाविलंब उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व जवळजवळ बहुतेक सहजयोगी बंधू-भगिनींनी आपली देणगी जाहीर केली. परदेशीय सहजयोगीही त्यात कमी पडले नाहीत.

सहजयोग विद्यालयाचे कार्य मोठे आहे. यास्तव ठिकठिकाणच्या सहजयोग्यांकडून आर्थिक मदतीची अपेक्षा आहे व त्यासाठी हे आवाहन.

ज्या सहजयोग्यांना वैयक्तिक वा सामूहिक देणगी द्यायची असेल त्यांनी आपली रक्कम रोख वा चेकने/ड्राफ्टने पुणे केंद्र प्रमुख श्री. राजेन्द्र पुगलिया यांच्याकडे सुपूर्त करावी. चेक/ डि. डि. असल्यास तो Life Eternal Trust या नावे काढावा. तसेच पोष्टाने पाठवविताना आश्रमाच्या पत्त्यावर पाठवावा.

सर्व सहजयोग्यांना सढळ आर्थिक मदतीसाठी कळकळीची विनंती.

प. पू. श्रीमाताजींनी देणगीदारांची नावे असलेला फलक नियोजित शाळेमध्ये ठेवण्याची सूचना केली आहे.



# मुंबई सार्वजनिक कार्यक्रम

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### मुंबई १२ मार्च २०००



सत्याच्या शोधात असलेल्या सर्व साधकांना माझा नमस्कार.

हिंदी आपली राष्ट्रभाषा असल्यामुळे मी प्रथम हिंदीमधून व नंतर मराठीमधून बोलणार आहे. कुंडलिनी जागरणाबद्दल मी अनेकदा इथे सांगितले आहे. कुंडलिनी जागृतीनंतर माणूस आतमधून पूर्ण परिवर्तन मिळवतो. माणसांना त्यांच्यामधील षड्रिपूंपासून होणारे त्रास संपतात. एरवी काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर या षड्रिपूंच्या प्रभावाखाली माणूस वावरतो. जीवनातील त्याचे सर्व व्यवहार प्रतिक्रिया करण्याच्या वृत्तीमधून चालतात; त्याच्यामुळे आपण जे काही करतो ते आपल्या हिताचेच आहे अशी समजूत आपण करून घेतो. आजकालची सामाजिक परिस्थिति लक्षात घेतली तर सगळीकडे अराजकता पसरलेली दिसते. सगळ्या क्षेत्रात अशा दुर्जनांची चलती आहे की ते लोक स्वतःही बरबाद होतील आणि इतरांचाही सर्वनाश करतील. याला कारण म्हणजे सध्या चालू असलेले घोर कलियुग. कलियुगाचा महिमाच असा असतो की दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांचेच सर्व काही व्यवस्थित चालत असते. पण हे सर्व जोपर्यंत त्यांची कुण्डलिनी जागृत होत नाही तोपर्यंत चालते. कुण्डलिनीच्या जागरणानंतर माणसामधे संपूर्ण आंतरिक परिवर्तन घडून येते; तो प्रतिक्रिया न करता शांत-स्वस्थ होतो. नुकतेच एका सहजयोग्याने मला सांगितले की सहजयोगात आल्यापासून नोकरीमध्ये कुठेही केव्हाहि बदली झाली तरी पूर्वीसारखा त्रास वा काळजी वाटत नाही. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील आणि हे परिवर्तन कुण्डलिनी आपोआप घडवून आणते. त्यासाठी तुम्हाला वेगळे असे काही करायची जरुरीच नाही. घरदार सोडून हिमालयात जाऊन तपस्या करण्याची जरुर नाही. कारण ही सर्व रचना परमात्म्याने जन्मतःच प्रत्येक माणसामधे तयार करून ठेवली आहे. ती शक्ति जागृत करण्याची म्हणजेच आत्मसाक्षात्कार मिळवण्याची शुद्ध इच्छा तुम्हाला असली की पुरे.

आजपर्यंत ह्यासाठी माणसांनी खूप कष्ट घेतले व घेत असतात. पण त्यांना 'आनंद' अजून मिळालेला नसतो. आनंद ही सुख-दुःखापलीकडची स्थिति असते. आनंदाला दुसरा विरोधी शब्दच नाही. कारण तो निखळ, एकच-एक असतो. हा आनंद कुण्डलिनी जागरणानंतरच प्राप्त होणारा आहे. कारण कुण्डलिनी जागृत होऊन टाळूबाहेर आली की तुमचा सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीबरोबर प्रत्यक्ष संपर्क घटित होत असतो. विशेष म्हणजे नावाप्रमाणे हे अगदी सरळ व सहजरीत्या घडून येते. शिवाय हा अनुभव जगभरातील एकूण-एक मानवजातीसाठी उपलब्ध आहे. आज ८६ देशांमधे सहजयोग कार्यरत आहे व लाखो लोकांना त्याचे अनेक फायदे मिळाले आहेत, त्यांचे सर्व प्रश्न सुटले आहेत व त्यांच्या कुटुंबात शांति नांदत आहे.

सर्व धर्मांची मूळ शिकवण हीच आहे की मानवाने आपले मूळ स्वरूप जाणणे हेच मानव जन्माचे सार्थक आहे. कुराणामध्येही सांगितले आहे की ''कयाम आयेगा तो आपके हात बोलेंगे''. पण कुणाला हे नकोच असेल तर

त्यांचे हात काय बोलणार? ती प्रत्येकाची मर्जी आहे. आजचे सर्व तऱ्हेने समस्याग्रस्त जीवन बघितल्यावर कुणालाही वाटेल की ज्यामुळे सदैव शांति मिळेल असा मार्ग मिळावा. तोच मिळण्याची ही वेळ आहे. पण आजचा प्रश्न असा आहे की लोक, विशेषतः महाराष्ट्रातील लोक, देवा-धर्माच्या नावाखाली अनेक कर्मकांडात अडकले आहेत; प्रत्येक घरात खंडीभर देव व तऱ्हतऱ्हेची पूजा-अर्चा. पण त्यापासून काय पदरात पडले? आपल्याला 'सत्य' समजले का? आइनस्टाईननेही म्हटले होते की Torsion Area मधेच विश्वाचे सत्य आहे; व त्याच्याशी संबंध साधणे फार जरुरीचे आहे. तेव्हा कर्म-काण्ड, नामस्मरण वगैरे करुन काही सत्य समजणार नाही, त्यासाठी सत्याच्या प्रकाशातच उतरले पाहिजे; व तिथे परिपक्व झाले पाहिजे. ही गोष्ट कठिण नाही. मी नेहमी सांगते की सहज-योग ध्यान फक्त महिनाभर केले की तुम्ही तुमचे गुरु व्हाल; तुम्ही स्वतः ठीक व्हाल आणि दुसऱ्यांनाही ठीक कराल. परमेश्वराने मनुष्य निर्माण केला तेव्हा मानवाला दुःखी, अशांत, ग्रस्त बघितलेले त्यालाच आवडणार नाही, इतके त्याचे तुमच्यावर प्रेम असते. म्हणूनच त्या परमात्म्यांची जन्मतः तुमच्यामध्ये स्थापिन केलेली शक्ति तुम्ही जाणली पाहिजे. सर्व साधुसंत महात्म्यांनी हेच सांगितले आहे. कबीरानेही तेच सांगितले. त्यांच्या काव्यामधून तर सहजयोगच त्यांनी वर्णन केला. अगदी इडा-पिंगला सुषुम्ना या नाड्यांबद्दलही त्याने लिहिले आहे. ''शून्य शिखरपर अनहत बाजे'' हे त्यांचेच शब्द. महाराष्ट्राचे आवडते संत नामदेव यांनीही हेच सांगितले; ते जेव्हा पंजाबमधे गेले तेव्हा गुरु नानकसाहेबांनी आदरपूर्वक त्यांचा सन्मान केला व गुरु-ग्रंथसाहेबामधे त्यांच्या पंजाबी भाषेत लिहिलेल्या ओव्या समाविष्ट केल्या. सगुणाबरोबर निर्गुण परमात्म्याबद्दलही त्यांनी सांगितले. परमात्म्याच्या या निर्गुण शक्तीला आदिगुरु शंकराचार्यांनी 'स्पंद' हा शब्द दिला आहे. स्पंद म्हणजेच माणसामधील सुप्त दैवी शक्तीच्या जागरणानंतरची खूण. पण हे सर्व जाणून घेण्याची इच्छा व स्थिति नसल्यामुळे माणूस भटकत राहिला आहे व सध्याच्या बिकट परिस्थितीत अडकला आहे व चुकीच्या मार्गाकडे भरकटला आहे. कुंडलिनीच्या जागरणानंतर



माणसाला स्वतःलाच योग्य काय अयोग्य काय, हितकारक काय व हानीकारक काय हे समजते. कुंडलिनीचा प्रकाश हृदयात आल्यावर आत्मा प्रकाशित होतो व त्याच्याकडून तुम्हाला हा विवेक मिळतो. परमात्म्याची शक्ति चारी दिशांना व्यापून असल्यामुळे ती तुमचे मग संरक्षण करत राहते. सर्व त्या परमात्म्याच्या तुमच्यावरील प्रेमामुळे घटित होते व माणूस आनंदी, शांत व सामर्थ्यशाली बनतो. माणसांच्या समाजात व देशातही शांति नांदू लागते. माणसामधे हे आंतरिक परिवर्तन आल्याशिवाय त्यांचे प्रश्न व त्रास संपणार नाहीत व तो चुकीच्या मार्गावरुनच चालत राहील. म्हणून हृदयातील हा दिवा पेटवला पाहिजे. म्हणून माझी सर्वांना विनंती आहे, की सर्वांनी आत्मसाक्षात्कार मिळवून या परम प्रेमशक्तीचा लाभ घ्यावा.

या महाराष्ट्रात कुण्डलिनीचे खूप कार्य झाले. नाथपंथीयांनी तर त्यासाठी खूप मेहनत घतली; संत ज्ञानेदेवांनी आपल्या गुरुंच्या परवानगीने 'ज्ञानेश्वरी' या अलौकिक ग्रंथात कुण्डलिनीवर स्वतंत्र सहावा अध्यायच लिहिला. पण सध्याच्या काळामधे इथले लोक भलत्या गोष्टींच्या नादी लागून कुठच्या कुठे वाहवत चालले आहेत व आपल्यामधे परमात्म्याने केवढे अमोल धन ठेऊन दिले आहे. याचा आपल्याला विसर पडला. ''सोनियाचा दिवस'' असे ज्याचे वर्णन करतात तो समय आता आला आहे. पसायदानमधे त्यांनी मागितलेले खरे होण्याचा हा काल आहे.

आपल्या पाठीमागील कण्याच्या टोकामधील त्रिकोणाकृति माकडहाडामधे ही कुण्डलिनी असते; या हाडाला वैद्यकीय शास्त्रात Sacrum Bone म्हणतात.



Sacrum या ग्रीक शब्दाचा अर्थ पवित्र असा आहे; अर्थात या परमेश्वरी शक्तीच्या अस्तित्वाची ग्रीक लोकांना फार पूर्वीपासूनच कल्पना होती. आपल्याकडे ते ज्ञान गुप्त ठेवले गेल्यामुळे लोकांना समजले नाही. पण आता हे ज्ञान समाजिक व जागतिक होत आहे. जिकडे जाल तिकडे सहजयोगाचे नाव कानावर येईल. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यांना हे मिळाले आहे त्यांनी ते इतरांना वाटले पाहिजे. तरच सर्व मानव जातीचा उद्धार होणार आहे. आणि हे होणार यात मला शंका नाही. पण हा अंतिम निर्णय करण्याचा समय आहे; जे कुण्डलिनी जागृत करून घेऊन सहजयोग मिळवतील त्यांचे कल्याण होईल, जे येणार नाहीत ते अधोगतीला जातील. हा निर्णय तुम्हालाच करायचा आहे. त्याच्यासाठी पैसा लागणार नाही. प्रलोभनाची जरूर नाही. पाहिजे ते फक्त तुमची शुद्ध इच्छा, आत्मसाक्षात्काराची शुद्ध इच्छा. कुण्डलिनीचे रूपच शुद्ध इच्छा आहे. एरवी आपण एक इच्छा करतो व ते मिळाले की दुसरी इच्छा. म्हणजे त्या इच्छा शुद्ध नसतात. समजा आपण पाण्यात असलो तर बोट सापडणे चांगलेच पण त्यातूनही आपल्याला पोहता येत असेल तर बुडणाऱ्या दुसऱ्या माणसाला वाचविणे जास्त चांगले. तसेच हे कार्य आहे आणि हे जितके जास्त पसरेल तितके जास्त लोक सुधारतील आणि सारे जगच बदलून जाईल. तुम्ही एक निर्मळ, प्रेमळ व्यक्तिमत्त्व व्हाल. या सहजस्थितीला लोकांना आणण्याचे कार्य आम्ही अनेक वर्षांपासून करत आहोत. या मुंबईसाठीही मी खूप कष्ट घेतले आहेत. पण इथे सहजयोग घेण्यास लोक तयार नाहीत याचे कारण मला समजत नाही. त्या मानाने दिल्लीमधे व उत्तर भारतात खेड्यापाड्यातूनही प्रचंड संख्येने लोकांनी सहजयोग स्वीकारला आहे. मुंबईमधे मराठी लोकांच्या मानाने परप्रांतीय सहजयोगी लोक जास्त असल्यामुळे हे होत असेल. दुसरे कारण म्हणजे लोकांच्या कर्मकाण्डी व बुद्धिवादी प्रवृत्तीमुळे लोक इकडे बघायलाच तयार नाहीत. तसेच महाराष्ट्रात अष्टविनायक आहेत, देवींची पीठे आहेत. ज्योतिर्लिंग आहेत अशी ही जागृत पुण्यभूमि आहे; शिवाय इथे अनेक थोर संतांनी कार्य केले आहे. रामदास स्वामीनींही कुण्डलिनी जागृति 'तत्क्षणी' होते असे म्हटले होते. पण इथे संतपुरुषांनाही छळ सोसावा लागला. अशा या महाराष्ट्रात सहजयोग का पसरत नाही मलाच समजत नाही. नाही तर पंढरपूरची वारी व पालख्या यात लोक वेळ व श्रम वाया घालवतात व त्याचेच त्यांना कौतुक वाटते. वर अशा लोकांना आपल्या नादी लावणारे भामटे अ-गुरुही खूप आहेत. म्हणून सत्य जाणणे व त्या मार्गावर वाटचाल करणे ह्यातच आपले कल्याण आहे हे लोकांना सांगणे जरूरीचे आहे. जिथे सत्य आहे तिथे प्रेम आलेच. या प्रेमापोटीच तुम्हाला सहजयोगाची सर्व माहिती व आत्मसाक्षात्कार मिळेल व फक्त महिन्याभरात तुम्ही तो आणखी लोकांना देण्यास सिद्ध व्हाल. एरवी बुद्धि वापरून हे कार्य होणार नाही कारण हे चैतन्य बुद्धीच्या पलीकडचे आहे; आत्म्यामधे प्रकाश आल्याशिवाय बुद्धि सुबुद्धि होत नाही.

तेव्हा महाराष्ट्राचे कल्याण करण्यासाठी सहजयोग्यांनी येथील सर्व जनतेला जागृति देण्याच्या कार्याला वाहून घ्यायला हवे. जात, पंथ, धर्म इकडे बघू नका. सगळ्यांना जागृति मिळाली की इथले सर्व प्रश्न, मतभेद, वादविवाद संपणार आहेत. लोकांना सहजयोग देण्याचे आपले ब्रीद आहे असे समजून तुम्ही कार्याला लागले पाहिजे. माझी हीच इच्छा आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

# सहज-समाचार

कुलाबा, मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात दि. मार्च २००० रोजी शासकीय सनदी (I.A.S.) अधिकाऱ्यासाठी सहजयोगाचा मानसिक तणावमुक्तीसंबंधातून एक विशेष कार्यक्रम झाला. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मुंबईमधील ज्येष्ठ सहजयोग्यांनी व युवाशक्तीने विशेष पुढाकार घेतला होता. कार्यक्रमास प. पू. श्री माताजी स्वतः उपस्थित होत्या.

कार्यक्रम सकाळी ११ वा. सुरु झाला. श्री माताजींचे आगमन होईपर्यंत श्री. योगी महाजन यांनी सुमारे एक तासभर सहजयोग, कुण्डलिनी व चक्र-संस्था याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यामध्ये सहजयोगाची आवश्यकता व वैशिष्ट्य, मानसिक ताण-तणावाची कारणे आणि कुण्डलिनी व्यवस्था व ध्यानामधून त्यांचे निराकरण मानवी जीवनामध्ये शांति-समाधान-आनंद देणारा योग व ध्यानाचे सर्व स्तरांवरचे फायदे इ. चा उहापोह होता.

सर सी. पी. साहेबांनीही मोजक्या शब्दात सनदी अधिकाऱ्यांना व्यस्त शासकीय जबाबदारी पार करतानाही सहजयोग करण्याची आवश्यकता विशद केली.

प. पू. श्री माताजींनी आपल्या भाषणामधे सनदी अधिकाऱ्यांच्या स्वतः अनुभवलेल्या जीवनशैलीबद्दल कल्पना दिली व त्यांची राष्ट्रीय स्तरावर उत्तम जनधारा बनवण्याची जबाबदारी मोठी असल्याचे सांगितले. सतत समस्याप्रधान शासकीय कार्यबाहुल्यामुळे ते लोक उजव्या बाजूकडे जात असल्यामुळे ध्यानामधून संतुलन सांभाळण्याच्या आवश्यतेवर त्यांनी भर दिला. अशा अधिकाऱ्यांना व विशेषतः त्यांच्या पत्नीला अहंकार आणि दिखाऊपणाच्या वागण्यापासून सावधानतेचा इशाराहि श्री. माताजींनी दिला.

कार्यक्रमाचे अखेरीस श्री. माताजींनी सर्व अधिकाऱ्यांना जागृती दिली व चैतन्यलहरींची अनुभूति दिली. त्याच वेळेस चैतन्यलहरींबद्दल आपल्याकडील थोर आचार्यांनी तसेच बायबलमधे कसे वर्णन केले आहे हे समाजावून दिले.

कार्यक्रमास सुमारे ३५० अधिकारी जमले होते. वार्ताहर मंडळी पण हजर होती; त्यांनी दूरदर्शन वाहिनींसाठी शूटिंगही केले. तसेच छोटीशी मुलाखतही घेतली. नमुना म्हणून वर्तमान पत्रात या कार्यक्रमाबद्दल छापून आलेल्या बातमीची प्रत सोबत दिली आहे. ●

## निर्मलादेवी यांच्या मार्गदर्शनाचा सनदी अधिकाऱ्यांना लाभ

मुंबई, दि. ११ (स्थानिक प्रतिनिधी) - सहजयोग साधनेद्वारे तणावमुक्त जीवन व्यतित करण्यासंबंधी निर्मलादेवी यांच्याकडून होणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ आज अनेक सनदी अधिकाऱ्यांनी घेतला.

सहजयोगाच्या संस्थापिका श्री माताजी निर्मलादेवी यांचा मार्गदर्शनपर कार्यक्रम येथील यशवंतराव चव्हाण केंद्रात आयोजित करण्यात आला होता. अनेक सनदी अधिकाऱ्यांच्या गर्दीत झालेल्या या कार्यक्रमात प्रशासकीय कामकाजादरम्यान निर्माण होणाऱ्या मनःस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे तंत्र अवगत करून देण्यात आले. दैनंदिन कामाच्या व्यापात मानसिक तसेच भावनिकता निर्माण होण्याच्या प्रक्रियेत शरीरातील ऊर्जेचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. यावरही निर्मलादेवींनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या मार्गदर्शनाचा लाभ उद्या (रविवार) शिवाजी पार्क येथे सायंकाळी ७ वाजता होणाऱ्या जाहीर कार्यक्रमातही होणार आहे. सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. लाईफ इंटरनलं ट्रस्टतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# 'Stay in the present, and stay balanced'

By A Staff Reporter

MUMBAI: Many a head nodded in agreement as Nirmala Devi, spiritual leader and founder of Sahaja Yoga, said, "Don't be too harsh on yourself. Stop feeling guilty about what has happened. Forgive yourself and forgive others."



Nirmala Devi

She was speaking to the officers of Indian Administrative Service on "Stress and Tension Management" at the Y.B. Chavan auditorium on Saturday afternoon.

She described the IAS and IPS officers as the "spine of the country" and said that they should not be under any kind of stress or strain.

For *mataji* as she is popularly known, peace lies within an individual and it needs to be discovered. According to her, it is essential to go into the meditative state to reach that state. "And it is just the beginning of a transformation that takes us to a higher level of awareness," she said. Nirmala Devi noted that people were not aware of the subtle system that works within every being. Explaining the concept of "*kundalini* awakening", she said that the *kundalini* was the energy that lay dormant in the sacrum (bone at the base of the spine). In a broader sense, *kundalini* awakening was the process of self-realisation, which helps a person overcome stress and heals the harried nervous system. She believes that self-realisation was a person's first encounter with reality.

According to the *shastras* also, she said, power resides within every human being. Sahaja Yoga uses this subtle inner instrument — *kundalini*, to bring about a balance in the physical, mental, emotional and spiritual being.

"When the *kundalini* is awakened, it helps the person humble down. It also brings about self-realisation. The awakening itself is known as self-realisation," she said. She added that people needed to relax today, and that too was possible with this awakening.

In her book, "Stress Management through Sahaja Yoga", she has explained that the left sympathetic nervous system, represents the power of desire of an individual, while the right represents power of action. "And it is the left side that you can control," she said, adding that there should be a balance between the two.

Sahaja Yoga aims at achieving holistic health care for people with meditation. Elaborating on the benefits of meditation, she said that a person could attain a peaceful state of mind and still stay alert. "One feels compassion for humanity and is able to let go of anger, hatred, fear, resentment and other negative traits that inhibit a person's growth," she said.

"If you feel bad, you torture yourself. Learn to stay in the present and stay balanced," she said.

## १४ फेब्रुवारी रोजी प. पू. श्री माताजींची 'शिवस्पर्श' प्रदर्शनास भेट

१२ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी या दरम्यान श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी 'शिवस्पर्श' हे प्रदर्शन बालगंधर्व कलामंदिरामधे भरवले होते. तेथे छत्रपति शिवाजी महाराजांच्या सर्व महत्त्वाच्या किल्ल्यांची माहिती फोटोसह प्रदर्शित करण्यात आली होती. शिवकालीन शस्त्रे व तलवारीपण तेथे ठेवण्यात आल्या होत्या. बाबासाहेब पुरंदरे यांनी श्रीमाताजींची प्रतिष्ठानवर भेट घेऊन श्रीमाताजींना प्रदर्शन बघण्यासाठी आमंत्रित केले. श्री माताजींनी आमंत्रण स्वीकारून प्रदर्शनाला १४ तारखेला भेट दिली. श्री माताजींनी श्री बाबासाहेब पुरंदरे यांचे व त्यांच्या पूर्ण टीमचे व त्यांच्या कार्याचे खूप कौतुक केले. श्री माताजींनी प्रत्येक फोटो मोठ्या उत्सुकतेने बघितला. श्री माताजींनी शिवपुजेच्या दरम्यान बालेवाडी स्टेडियमवर तेच प्रदर्शन भरवण्यास सांगितले व त्याप्रमाणे ते भरवण्यात आले होते. त्यामुळे विदेशी बंधु-भगिनींना त्याचा लाभ घेता आला व त्यांना शिवाजी राजांबद्दल बरीच माहिती मिळाली.

# दिवाळी पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### कबेला (ग्रीस) १० नोव्हेंबर ९९

यावर्षी दिवाळी-पूजा ग्रीसमध्ये होत आहे ही फार भाग्याची व शुभ गोष्ट आहे; त्यातूनही ही बेल्जियमध्ये होत आहे हे जास्त महत्त्वाचे. कारण अॅथेना ही इथली देवी आदिमाता होती. पुराणामध्येही या ठिकाणाचा मणिपूर असा उल्लेख आहे. म्हणजेच ग्रीस हे नाभीचक्राचे स्थान आहे व अॅथेना म्हणजेच आदिशक्ती हे तिचे स्थान आहे. ही आदिमाता समुद्रात प्रगट झाली; सर्व अस्तित्वाचा उगम तिच्यापासून झाला; प्रथम तिने श्रीगणेश निर्माण केले व उजव्या बाजूवर येऊन महासरस्वती निर्माण केली; मग खाली येत-येत तिने महालक्ष्मी निर्माण केली व कुण्डलिनी म्हणून स्थिरावली. महालक्ष्मी हे आपल्या उत्थानाचे तत्त्व आहे. नाभीमध्ये तिचे प्रथम अवतार धारण केला. सजीव प्राण्यांना भूक ही स्वाभाविक इच्छा असल्यामुळे ती तृप्त करण्यासाठी नाभीमध्ये तिची स्थापना झाली. या अॅथेनाच्या हातात कुण्डलिनी व शस्त्र असण्याचे कारण विश्वामधील दुष्ट व्यक्तींबरोबर सामाना करण्यासाठी तिला तयार रहायचे होते. ग्रीक लोकांच्या पुराण-ग्रंथामध्येही हे वर्णन आहे पण कालांतराने माणसांनीच ते सर्व बिघडवून टाकले. त्यामुळे सर्व देव-देवतांना मानवी रूप दिले गेले. भारतीय संस्कृतीमधील अनेक देवदेवतांचे वर्णन ग्रीसमधील वर्णनांबरोबर जुळते, त्यात साम्य आहे; पण तिकडील देव-देवता दैवी रूपात असतात तर इकडील देवता मानवी रूपात दाखवल्या गेल्या. भारतामध्ये अनेक पुराणे असल्यामुळे तिकडे देव-देवतांचे मानवापेक्षा उच्च स्थितीचे असे रूप टिकून राहिले आहे. पुराणांचे बायबल किंवा कुराणासारखे पठण होत नाही. पण त्यामध्ये फार प्राचीन इतिहास लिहिलेला आहे.

राजा अलेक्झांडरच्या काळात ग्रीस हा फार समृद्ध व सुंदर प्रदेश होता. इथल्या गणपतीला मांडीवर घेतलेल्या अॅथेनादेवीच्या मंदिराचे वर्णनही एका कवीने सुंदरपणे करून ठेवले आहे. या मंदिरात तीन मोठ्या व एक लहान पायरी आहे हे साडेतीन वेटोळ्याचे द्योतक आहे. इथे स्वयंभू गणेशही असल्याचे उल्लेख आहेत. पण हे सर्व वर्णन भारतातील पुराणांमध्ये अलेक्झांडरच्या स्वारीच्या कितीतरी आधीपासून केले गेले आहे. अर्थात त्या पुरातन काळातही या प्रदेशांमध्ये देवाण-घेवाण व संपर्क असावा किंवा ज्याला आजकाल शास्त्रज्ञ Torsion Area असे म्हणतात त्यातून हे ज्ञान झाले असेल. इतकी ही पुरातन भूमि आहे. पण ख्रिश्चन धर्म पसरू लागल्यावर ह्या सर्व गोष्टी हळूहळू लोप पावल्या व लोकांना माहीत नाहीशा झाल्या. अशा या ग्रीसमध्ये म्हणजेच मणिपूर चक्रावर आपण लक्ष्मीपूजन करणार आहोत ही फार भाग्याची गोष्ट आहे असे मी म्हणाले. इथेच आदिमाता अॅथेनादेवीने लक्ष्मी निर्माण केली म्हणून इथले लोक समृद्ध व सागरी वाहतूक करणारे श्रीमंत होते - म्हणूनच माझ्या पतीबरोबर माझे येथे येणे झाले होते. त्यावेळेस माझे आगमनाच्या वेळी मोठमोठ्या पदाधिकाऱ्यांच्या सहचारिणी माझ्या स्वागतासाठी विमानतळावर आल्याचे पाहून मी चकितच झाले; नंतर मला सांगण्यात आले की अत्यंत तेजस्वी, पूर्णतया स्त्रीशक्तीचे रूप असलेली, धीरगंभीर व प्रसन्न अशी महिला पाहायची असेल तर मला भेटा असे त्यांना सांगण्यात आले होते. आजकालच्या जमान्यात त्या स्त्रियांना अशा व्यक्तिमत्वाची अपूर्वाई वाटावी हे आश्चर्यच होते. त्यांनी माझ्यासाठी सर्व पाहुणचार केला व माझ्या सुखसोयींकडे लक्ष दिले.

दिवाळीचे असेही एक महत्त्व आहे की या काळांत असणारी प्रदीर्घ रात्र (अंधार) संपवण्यासाठी प्रकाश जरूर असतो म्हणून दिवाळीच्या सणांत खूप दिवे लावतात. कलियुगाचाही असाच अंधार सर्वत्र पसरलेला आहे, लोक मेटाकुटीला आले आहेत, म्हणून लोकांना आत्मज्ञानाच्या प्रकाशाची जरूरी आहे. याकाळात अनेक भयानक गोष्टी घडत आहेत, देवाच्या नावाखाली गलिच्छ प्रकार चालले आहेत आणि लोक भरकटत चालले आहेत. वर त्या सर्वांचे समर्थन केले जात आहे. स्वातंत्र्याच्या चुकीच्या धारणा डोक्यात बसल्यामुळे हे होत आहे. अगदी चर्चमधेही हीच परिस्थिति आहे. म्हणून या कलियुगाचा अंत करण्यासाठी

प्रकाश हवा; अंधार संपवण्यासाठी लोकांना आत्मप्रकाशात आणले पाहिजे, तरच त्यांचे अज्ञान संपून त्यांना अंतिम सत्याचे ज्ञान मिळेल. या नवीन युगाची सुरूवात झाली आहे आणि त्यामधे प्रेम व करूणा यांचेच राज्य चालणार आहे, त्यामधे लोक खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार आहेत, कसल्याही वाईट प्रवृत्तींचा लोकांमध्ये शिरकाव होणार नाही किंवा लोक त्यांच्या प्रभावाखाली येऊन स्वतःची योग्यता गमावणार नाहीत. असे व्यक्तिमत्त्व असलेले लोक सगळीकडे तयार झाले की कलियुगाचे सर्व त्रास संपून जातील. म्हणूनच हा 'अंतिम निर्णय' (Last Judgement) करण्याचा समय आहे असे मी पुन्हा पुन्हा सांगत असते; जे सत्याबरोबर राहतील, सत्याला ठामपणे स्वीकारतील व सत्यामधेच परिपक्व होतील ते तरून जातील व इतरांचा ऱ्हास होईल.

कलियुगाच्या अंधारामुळेच लोक धडपडत आहेत, ठेचकाळत आहेत. अज्ञानरुपी अंधारामुळे माणसाला आपण काय करत आहोत, कुठे चाललो आहोत हे कळत नाही. हे ज्याला समजले व जो त्यातून बाहेर पडून प्रकाशात येतो तो सहजयोगी.

कलियुगाचा आणखी एक प्रभाव म्हणजे लोकांना ठेचा लागल्या तरी ते स्वतःमधे सुधारणा करणार नाहीत. उलट सतत दुसऱ्याला दोष देत बसतील. दुसऱ्याच्या चुका काढतील पण स्वतःच्या चुका समजून घेणार नाहीत आणि समजल्या तरी मान्य करणार नाहीत. ह्यालाच भ्रान्ति म्हणतात आणि ती संपली पाहिजे. त्यांच्यात अडकला की माणसांचे नुकसानच होणार. पण ही कलियुगाची भ्रान्ति एकदा लक्षात आली की माणूस साधक बनून सत्य शोधू लागतो. म्हणून आजकाल लोकांमध्ये ही साधक-वृत्ति बळावत आहे. नल-दमयंती आख्यानामध्ये कलिने नलराजाला हे त्याचे महात्म्य– कलियुगातच लोक साधन बनतील व सत्याच्या शोधासाठी प्रयत्न करतील– सांगितल्याचे तुम्हाला माहीत आहेच. आणखी एक कलियुगाचा विशेष त्याने सांगितला आहे की सत्य शोधण्यासाठी लोकांना घरदार सोडून दऱ्या-खोऱ्यांत जाण्याची जरूर पडणार नाही तर प्रपंच सांभाळूनच (प्रपंचाची माया समजल्यावर) त्यांना सत्य सापडेल.

तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि या आत्मप्रकाशामधूनच सर्व अंधःकार नाहीसा होणार आहे. दीपावलीचा उत्सव म्हणूनच महत्त्वाचा आहे व प्रकाशाचे द्योतक आहे. पण आपल्याला अजून खूप दिवे पेटवायचे आहेत. कारण अजून पुष्कळ लोकांना आपल्याला वाचवायचे आहे. हे अवघड असले तरी अशक्य नाही. सहजयोगी बंधू-भगिनी दूरदूरच्या प्रदेशात जाऊन कार्य करत आहेत. ही सर्व प्रक्रिया सहजमधेच होत आहे. किती लोकांना सहजयोगात आणून आपण वाचवणार आहोत हाच एक प्रश्न आहे. म्हणून प्रत्येक सहजयोग्याने निश्चय केला पाहिजे की ''मी रोज एकाला तरी आत्मसाक्षात्कार देणार''. अपघातात पाण्यामधे बुडत असणाऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी जसे आपण धावून जातो तसेच हे कार्य आहे. म्हणून प्रत्येकाने जोमाने कार्य केले पाहिजे.

या कार्यामधेही काही अडचणी व प्रश्न समोर येत आहेत. एक म्हणजे भूक- पैशाची, सत्तेची, अन्नाची इ. पैशाची भूक कधीच संपणार नसते पण तरीही माणूस त्याच्याच मागे लागतो. संपत्तीचा देखावा करण्यात मग्न होतो आणि त्यापायी चुकीच्या गोष्टी करू लागतो. मग मनावर मायेची भ्रांति चढते, अहंकार बळावतो. म्हणूनच लक्ष्मी-तत्त्व समजून घेतले पाहिजे. लक्ष्मी फार चंचल असते. नोकरलोकांना जरा पैसे मिळाले की दारूत उडवणार. म्हणून लक्ष्मीची भुरळ पडू देता कामा नये. पण त्याचबरोबर हेहि लक्षात घेतले पाहिजे की लक्ष्मी बंदिस्त करून ठेवता येत नाही. म्हणून तिचा योग्य विनिमय झाला पाहिजे.

पूर्वी मलाच वाटायचे की हे कार्य कसे होणार; पण आता तुमच्याकडे पाहिल्यावर, तुमची प्रगति पाहिल्यावर, तुमची निष्ठा पाहिल्यावर माझी खात्री आहे की सहजयोग स्थिरस्थावर होईल. बरेच जणांना वाटते की सहजयोगाचे कायदे-कानून लिखित असावे, पण मला त्याची जरूर वाटत नाही, कारण तुमच्या अनुभवातून तुम्ही शिकत जाणार आहात.

म्हणूनच अनीतीच्या मार्गाने कितीही पैसा मिळवला तरी त्यातून कधी ना कधी नुकसानच होते. तसेच पैसा आहे म्हणून तो कशावरही उधळायचा हेहि चुकीचे आहे. म्हणून पैशाचे हे व्यवहार – लक्ष्मीचे वहन – नीट पारखले पाहिजेत, त्याच्या नादाने आपण कुठे चाललो आहोत हे समजले पाहिजे. हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. नाही तर जे मिळवण्यासाठी तुम्ही इथे आला आहात ते कधीच प्राप्त होणार नाही. तुम्हाला आत्म्याशी एकरूप व्हायचे आहे. हे सर्व अतिसूक्ष्म प्रकारचे आहे. कारण तुम्ही चुकला तरी शरीराकडून वा मनाकडून कसलीही प्रतिक्रिया होणारी नसते. माझा तर असा अनुभव आहे की इतक्या

पर्यानंतरही काही सहजयोग्यांचे लक्ष्मी तत्त्व व्यवस्थित नसते, काही माझ्याशी प्रामाणिक नसतात; काही सहजयोगातून पैसा मिळवण्याच्या मागे असतात. म्हणूनच आता त्यांची परिस्थिति अगदी हलाखीची झाली आहे. म्हणून सहजयोग्यांबरोबर कसलाही धंदा करू नका. लक्ष्मी चंचल आहे म्हणतात. त्याचा हाच अर्थ आहे. म्हणून प्रत्येक गोष्ट करताना व्हायब्रेशन्स पहात चला. प्रत्येक बाबतीत सतर्क राहून आपली जबाबदारी ओळखून रहा.

जीवनाबद्दलची आपली भूमिका साक्षीभावाची झाली पहिजे. मग जे काही दिसेल वा पहाल त्याचा स्पष्ट अर्थ तुमच्या लक्षात येईल. मग तुम्हाला प्रत्यक्ष पाहण्याचीही जरूर पडणार नाही. कारण व्हायब्रेशन्समधून तुम्हाला सर्व काही समजेल. ज्यांना अजून नीट व्हायब्रेशन्स समजत नसतील त्यांनी आपली स्थिति सुधारून घेतली पाहिजे. त्याशिवाय तुम्हाला खरे ज्ञान होणार नाही. व्हायब्रेशन्स ठीक झाली की मग अडचण नाही. सर्व काही तुमचे तुम्हालाच स्पष्ट होईल. तुमचे मन प्रकाशित झाल्यानंतरच हे शक्य आहे. पूर्वी सहजयोगात स्थिरावलेले लोक कमी होते. अर्धवट सहजयोग जाणणारेच जास्त; आणि त्यांना काही सांगणेही कठीण होते, कारण ते कंटाळून बाहेर पडतील अशी शंका वाटायची. दुसरे म्हणजे सहजयोगात कसला पैसा मागितला जात नसल्यामुळे लोकांचा विश्वास न बसता ते पळून जायचे. पण जे खरे साधक असतात ते बरोबर टिकून राहतात व प्रगत होतात, कारण त्यांना प्रकाश मिळालेला असतो व त्यात ते प्रगत होण्यासाठी प्रामाणिक असतात.

अशा तऱ्हेने या भयानक कलियुगाच्या अंधःकरातून आपल्याला दीपावलीच्या प्रकाशाकडे यायचे आहे. प्रत्येकाने स्वतःच प्रयत्न करून स्वतःची प्रगति करत उन्नत व्हायचे आहे. त्यासाठी स्वतःची चक्रे, त्यांच्यावरचे त्रास व्हायब्रेशन्सवरून बघत राहणे जरूरीचे आहे. एरवी बडबड करून, भाषणे देऊन काही साध्य होणार नाही. व्हायब्रेशन्सबद्दल सतत सतर्क व संवेदनशील राहिल्यावर प्रत्यक्ष अनुभवामधून तुम्ही खूप काही शिकाल. सुरुवाती-सुरुवातीला ही मानसिक प्रक्रिया आहे असे कदाचित तुम्हाला वाटले तरी हळुहळु तुम्ही त्या मानसिकतेतून पार पडाल. आता कलियुग जवळजवळ संपत आले आहे; पण तरीही अजून काही लोकांना परत पूर्वायुष्याकडे जावेसे वाटते; त्यावरही उपाय म्हणजे ध्यान करणे; **ध्यान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण ध्यानामधूनच तुम्ही काही साध्य करू शकणार आहात. त्याचबरोबर स्वतःकडे सतर्कपणे लक्ष ठेवले पाहिजे. नाहीतर लक्ष्मीच्या सापळ्यात तुम्ही केव्हा अडकून पडाल तुम्हालाच कळणार नाही.** म्हणून या रूपसंपन्न, तेजोमय लक्ष्मीचा संदेश आपण डोळ्यापुढे ठेवला पाहिजे. **आपले ध्येय या पृथ्वीवर परमेश्वराचे राज्य प्रस्थापित करणे हे आहे, त्या ध्येयाकडेच आपली नजर राहिली पाहिजे. ध्यानामधूनच ही स्थिति मिळणार आहे. ध्यानात राहणे म्हणजे स्वतः ला पूर्णपणे परमात्म्याच्या हवाली करणे, सत्याशी हातमिळवणी करणे;** मग तुमच्या हातून चुकीची गोष्ट होणारच नाही, ध्यानात उतरल्यावर कसलीही काळजी करण्याची वेळ येणार नाही. पण **ध्यानच केले नाही तर काहीच साध्य होणार नाही आणि ध्यानाशिवाय प्रगतीही होणार नाही.** सर्व सहजयोग्यांनी हे लक्षात ठेवायला हवे. स्वतःकडेच पहा, आपण किती गहनतेत आहोत इकडे लक्ष द्या, स्वतःमधे किती सुधारणा होत आहे हे तपासत रहा. तसे करत राहिलात की मगच आत्मसाक्षात्कारी पुरुष व्हाल, आत्मसाक्षात्काराची विशेषतः व महत्त्व तुम्हाला समजेल; ही शक्ति स्वतःसाठी नसून दुसऱ्यांसाठी मिळालेली आहे हेहि तुम्हाला जाणवेल आणि त्या अनुरोधाने तुम्ही सामूहिकतेमधे खऱ्या अर्थाने उतराल.

हे सगळे भाषणामधून ऐकणे एवढेच पुरेसे नाही तर ते प्रत्येकाने आत्मसात करायचे आहे. तरच कार्य होणार आहे. आजच्या या दिवाळीच्या शुभदिवशी इतके सारे सहजयोगी एकत्र जमल्याचे पाहून जगभरातील मानवजातीच्या उद्धाराची आशा बळावत आहे. हा आनंद साजरा केल्यावर तुम्ही ध्यानात राहिलात तर तुम्हाला सर्व गोष्टी लक्षात येतील व तुमचे महत्त्व व जबाबदारी तुम्हाला जाणवेल. माझ्या सर्व आशा तुमच्यावर आहेत व तुम्हीपण आपल्याला काय मिळाले आहे व काय करायचे आहे हे ओळखाल; हे कुण्डलिनी जागृतीचे कार्य फार समाधान देणारे आहे. संपूर्ण मानवजातीमधे परिवर्तन घडवणे ही आता तुमची जबाबदारी आहे. माझे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

# पुणे सहज-आश्रम


प. पू. श्रीमाताजींच्या आशीर्वादाने व कृपेमध्ये पुणे सहजयोगाची स्वतःची वास्तु नुकतीच बांधून जवळजवळ पूर्ण झाली, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. या कार्यासाठी पुणे केंद्रातील अनेक सहजयोग्यांचा हातभार व पुणे केंद्रप्रमुख श्री. राजेंद्र पुगलिया यांचा पुढाकार व पाठपुरावा यातूनच हे कार्य पुरे झाले.


पुणे केंद्रातील सर्व सहजयोग्यांच्या शुद्ध इच्छेमुळे या वास्तूचे उद्घाटन प. पू. श्रीमाताजींच्या कमलहस्ते दि. ३ मार्च २००० ला झाले. त्यांचे आशीर्वाद मिळाले हे आमचे भाग्यच. त्या सोहळ्याच्या दिवशी श्री माताजी खूप प्रसन्न होत्या व त्यांनी कार्याच्या यशस्वीतेबद्दल आनंद प्रगट केला.













हा सोहळ्याचा आनंद द्विगुणित करण्यासाठी त्याच समारंभाचा एक भाग म्हणून सुप्रसिद्ध नाट्य-कलाकार श्रीमती कीर्ति शिलेदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'संगीत स्वयंवर' हे नाटक अप्रतिमपणे सादर केले. सर्व कलावंतांचे श्रीमाताजींनी कौतुक केले व त्यांना आशीर्वाद दिले.

पुणे येथील साप्ताहिक मध्यवर्ती ध्यान-केंद्र या वास्तूमध्येच दर शनिवारी सायं. ६॥ वाजता भरते. केंद्रामध्ये आता आमचा स्वतःचा कॉम्प्युटर व दूरध्वनी चालू झाला आहे.

आश्रमामध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या सहजयोग्यांसाठी रहाण्याची व्यवस्था अल्पशा शुल्क दरात केली आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या सहजयोग्यांनी येण्यापूर्वी त्यांच्या लिडरची परवानगी घेऊन पुणे केंद्र प्रमुखांशी संपर्क साधावा. (दुरध्वनी (निवास) ७६५४४००)

केंद्राचा पत्ता - सहजयोग केंद्र
प्लॉट नं. ७९, सर्व्हे नं. ९८
भुसारी कॉलनी,
कोथरूड ४११०३८

दूरध्वनी ५२८४२३६
Email Address Sahajyog pune @ Satyam. net. in

# नवरात्री पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### कबेला : १७ ऑक्टोबर ९९

आज आपण देवी महाकालीची पूजा करणार आहोत. देवीने अनेक वेळा सज्जन व सत्शील लोकांना त्रास देणाऱ्या, त्यांच्या प्रगतीत व पुण्यकार्याला विरोध करणाऱ्या राक्षसी शक्तींचा संहार करण्यासाठी अनेक रुप धारण केली. दुर्गा हे असेच एक रुप. तिने जसा राक्षसांचा संहार केला तसेच अलिकडच्या महायुद्धांमधेही सज्जनांचे रक्षणही केले. राक्षसी वृत्तींच्या माणसांना मत्सर फार असतो व तो अनेक घातक प्रकारांतून व्यक्त होतो. जे जन्मतःच अशा राक्षसी प्रवृत्तीचे असतात त्यांना ओळखणे अवघड नाही. कारण त्यांची सूडबुद्धि वारंवार प्रगट होत असते, ती त्यांच्या स्वभावातच मुरलेली असते. अशा प्रवृत्तींचे लोक जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांचे राक्षसी कार्य प्रचंड रूप धारण करून माणसांना जिणे नकोसे करते. अशा माणसांना परमात्मा कधीच क्षमा करत नसतो. त्यांच्याबद्दल दयाही दाखवत नसतो, त्यांचा संहार करणे हेच देवीचे कार्य असते. त्याचबरोबर तिच्या हृदयांत तितकेच प्रेम व करुणा असते; पण मानवजातीच्या हितासाठी तिला राक्षसांना नष्ट करणे भाग पडते. पण हे राक्षसी लोकही वेगवेगळ्या रुपांत पुन्हा-पुन्हा जन्म घेतात व सज्जनांना त्रास देत राहतात; कधी कधी ते असे रुप धारण करतात की वरवर पाहणाऱ्याला त्यांच्या काळ्या कारवायांची कल्पनाही येणार नाही. असे अनेक खोटे नाटे लोक प्रसिद्धीला आले व अनेकांनी मूर्खासारखा त्यांचा पाठपुरावा केला. अशा लोकांचीही एकजूट असते व त्यांच्याविरुद्ध बोलायला कुणी धजावत नाही; कारण त्या सर्वांचे कार्य परमेश्वराच्या विरोधांत असते; सज्जनांना उन्नती मिळण्याच्या विरोधांत असते. कलियुगांत तर हे फार मोठ्या प्रमाणावर घडते आणि अनेक सज्जनांनाही भुरळ पडून ते त्यांच्या सापळ्यांत अडकतात; विवेक काम करेनासा झाल्यामुळे ते चुकीच्या मार्गाकडे वळतात आणि कधी कधी स्वतःचे समर्थन करण्याचा प्रयत्न करतात. अर्थात या कलियुगामध्येच असे अनेक राक्षस होऊन गेले आणि जे आहेत त्यांचेही पितळ उघडे पडत आहे; तरीही त्यात काही असेही अजून आहेत जे त्यांच्या कारवाया उघडकीस आणणाऱ्या लोकांचा सर्वनाश करण्याच्या मागे लागले आहेत. त्यांची पद्धत अशी आहे की ते लोकांचा बुद्धिभ्रंश करुन स्वतःचे स्तोम माजवतात आणि लोकांना त्यांच्या बढायाबद्दल शंका येत नाहीच पण ते सिद्ध करुन दाखवायची मागणी करायलाही घाबरतात. त्यावर सहजयोग हाच उपाय आहे कारण . सहजयोग प्रत्यक्ष अनुभूतीवर आधारित आहे. पण ह्या सहजयोगातही आधी परिपक्वता मिळवणे अत्यंत जरुरीचे आहे; कुणाला त्यासाठी कमी जास्त वेळ लागतो; म्हणूनच मधेच चुकीच्या मार्गाकडे कुणी वळला तर त्याच्या हातात काहीच पडणार नाही. विशेषतः सहजयोगात बरेच प्रगत झालेल्या लोकांवर अशी वेळ आली तर ते कुठल्या कुठे घसरून पडतील नेम नाही.

अशा परिस्थितीत आपण आपल्यामधील महाकालीचा आदर व पूजा केली पाहिजे. तिचे सर्व प्रथम कार्य म्हणजे ती आपले संरक्षण करते; कसल्याही कठीण परिस्थितीमध्येही ती तुमचे संरक्षण करत असते. बऱ्याच लोकांना याचा अनुभवही आला आहे. पण ती तितकीच दक्ष असते.

तुमच्याकडे बारीक लक्ष देऊन असते, तुम्ही चुकलात तरी तुम्हाला आतून संदेश देऊन सुधारण्याची संधि देते आणि तरीही तुम्ही सुधारला नाहीत तर तुमचा नाद सोडून देते. मग तुम्ही निराधार होता आणि सर्व वाईट गोष्टींकडे वळू लागता. म्हणून या महाकालीचा सतत आदर राखला पाहिजे म्हणजे सर्व संकटांचा सामना करण्याची शक्ति व स्वतःला सुरक्षित ठेवण्याची शक्ति तुम्हाला मिळते. अशा तऱ्हेने ही महाकाली तुम्हाला सर्व प्रकारे सांभाळते. या अर्थाने माणसाचे अस्तित्वच तिच्यामुळे आहे. महाकाली श्री शिवांची शक्ती आहे; तुम्हाला निद्रा देणारी, सत्याप्रत पोचवणारी हीच. त्याचबरोबर तुम्हाला ताळ्यावर येण्यासाठी ती भ्रान्ति निर्माण करते. तुम्हाला मायेमधें ओढते पण मायाजालातून सुखरुप बाहेर काढणारीही तीच आहे. आपणच आपल्या अहंकारामुळे तिला विसरतो; तिच्यावरच सर्व काही सोपविण्याची तयारी आपण ठेवली की तिचे पूर्ण आशीर्वाद आपल्याला मिळतात; शारीरिक असोत वा मानसिक तुमची सर्व काळजी ती दूर करते. म्हणून काळजी करण्याचे सोडून द्या; साक्षात महाकाली अशी आई तुमच्या पाठीशी असतांना काळजी कशाला करायची? ती तुमची काळजी घेत असल्यामुळे तुम्हाला कसलीही काळजी करण्याची जरुरी नाही. तिच्या चरणाशी नुसती प्रार्थना केलीत की तुमचे प्रश्न संपून जातात.

महाकालीला प्रकाश आवडतो. प्रकाशांत आलेले साक्षात्कारी लोक आवडतात. सूर्य आवडतो; अर्थात प्रकाश न आवडणाऱ्या लोकांपासून ती दूर राहते. असे लोक नेहमी भयग्रस्त असतात. पाश्चात्य लोकांना सूर्याच्या उन्हांत राहण्याची आवड असते; पण ते फार काम करत राहिल्यामुळे उजव्या बाजूचे होतात; मग ही महाकालीच त्यांना ठीक करते आणि त्यांना संतुलनात आणते. कार्यबाहुल्यामुळे व कामाचा बोज वा जबाबदारी वाढल्यामुळे झोप लागत नसली तर ती आपल्याला झोपवते; आणि शांत निद्रा मिळून आपण ताजेतवाने होतो. महाकाली आपली इतकी काळजी घेत असताना आपण तिच्यासाठी काय करु शकतो? तिच्या चरणांची पूजा करून तिला प्रसन्न ठेवू शकतो; आपण सारे तिची लेकरेच असल्यामुळे तिला लेकरांबद्दल प्रेम व करुणाच असते. पण त्याचबरोबर हेहि लक्षांत ठेवले पाहिजे की **जे तिच्या प्रेमछत्राखाली स्थिर झालेले नसतात त्यांना कधी कधी फटका बसू शकतो. त्यांच्यावर संकट येते. म्हणून आपल्याच मनाकडून आपल्याला काय सूचना मिळत आहेत, ते आंतून काय सांगत आहे, एखाद्या वाईट शक्तीच्या प्रभावाखाली न जाण्याबद्दल काय सुचवत आहे हे समजून घेऊन त्याप्रमाणे सतर्क राहिले पाहिजे.**

आणखी एक अडचण म्हणजे आपला अहंकार. आपण अहंकारामधून सर्व काही करत असल्यामुळे महाकालीशक्तिला विसरतो. तिला अबोधित लेकरे हवी असतात. तिनेच श्रीगणेश निर्माण केले. म्हणून आपण मनाने काही बेत करत व्यवहार करु नये. स्वच्छ मनाने जे घडते त्याचा आनंद घेत रहावे. अशी **अबोधितता महाकालीला आवडते. त्याचप्रमाणे प्रेम, करुणा, आदर, आपुलकी हे गुणही तिला आवडतात. अशा सहजयोग्यांच्या ती सदैव पाठीशी असते.** या करुणेमधूनच तुम्ही दुसऱ्यांना जागृती द्यावी असे तिला वाटते. ही महाकाली इतकी शक्तिशाली आहे की तुमच्याबद्दल तुम्ही जे काही करता त्यासह सर्व काही तिला माहित असते; तुमच्या हृदयांत व मनांत जे काही चालते तेहि ती सर्व जाणते. आई जशी तिच्या लेकराची सर्व काळजी घेते तशी ती तुमचा सांभाळ करते. ती सर्व अस्तित्वाला व्यापून राहते म्हणून ती सदैव तुमच्याबरोबर असते. म्हणून तुम्ही तिची हृदयापासून पूजा करत असाल तर तुम्हाला

कसलीही भिती वा संकट नाही. ती महालक्ष्मी स्वरुपांत आली की तुम्ही निरासक्त बनता; ती तुम्हाला उन्नतीच्या मार्गाने नेते, तुमच्या मानवी जन्माचा उद्देश व सार्थक तुम्हाला ध्यानांत आणून देते. मग तुम्ही फक्त सत्य जाणण्याच्या मागे लागता. त्यातून तुमची जाणीव प्रगल्भ व परिपक्क होते. कुण्डलिनी जागृतीमधूनच हे सर्व होणारे आहे. त्याला दुसरा पर्याय नाही. दुसऱ्या अनेक मार्गांनी गेलेले साधक अर्ध्या रस्त्यावरच हरवले गेले. पैसे कमावून अध्यात्म सांगणाऱ्या अ-गुरुंच्या आधीन झाल्यामुळे सर्व कही गमावून गेले. आत्मसाक्षात्कार होणे ही एक परमात्म्याचीच कृपा असल्यामुळे होणारी घटना आहे म्हणून त्यासाठी कुणीही पैसे मागू शकत नाही. म्हणून केवळ सत्य जाणण्याच्या शुद्ध मार्गाने चालणाऱ्या साधकांनाच महालक्ष्मी मदत करते.

तुम्हा सर्वांना सहजमधेंच आत्मसाक्षात्कार विनासायास मिळाला आहे. त्यासाठी या जन्मात काहीही कष्ट करण्याची वेळ तुमच्यावर आली नाही. सहजयोग आता खूप पसरला असला तरी अजून प्रत्येक सहजयोग्याने ते कार्य पुढे न्यायला हातभार लावायचा आहे, तीच तुमची जबाबदारी आहे. महाकाली आणि महालक्ष्मी या दोन्ही शक्ती तुमच्याबरोबर आहेत. तुमच्या कार्याला विरोध करणाऱ्या व तुम्हाला त्रास देणाऱ्या सर्व राक्षसांकडे महाकाली लक्ष देऊन त्यांचा संहार करणारच आहे. पण तुम्ही स्वतःही सतर्क राहून त्या लोकांपासून सावध राहिले पाहिजे. त्यांच्या लबाड्या व कार्यपद्धती पारखल्या पाहिजेत. तुमच्या आत्मप्रकाशामधे हे तुम्ही सहज जाणू शकाल; आणि ध्यानामधून त्यांच्या कारवाया थांबवण्यासाठी महाकालीला प्रार्थना करा व तिचे संरक्षण मागा. तुमचे हृदय मात्र शुद्ध ठेवा. आणि कार्यातही स्वच्छता व शुद्धता पाळा. मगच महाकालीचे सर्व आशीर्वाद तुम्हाला मिळतील.

सर्वांना अनंत आशीर्वाद



# श्रद्धांजली



बाबामामा आज आपल्यामध्ये नाहीत आणि त्यांच्या नावामागे 'कै' ही उपाधि लावण्याची वेळ आमच्यावर आली आहे, हे आमचे दुर्दैव. कै. बाबामामांचे दुःखद निधन दि. २८ फेब्रुवारी २००० रोजी झाल्याचे कानावर आले आणि सर्वांना धक्का बसलाच पण त्याहीपेक्षा सहजयोगाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक तारा निखळल्याच्या वेदना अधिक जाणवल्या.

बाबामामांचे पूर्ण नाव ''हेमेन्द्रकुमार प्रसादरावजी साळवे' आणि प. पू. श्रीमाताजींचे ते सर्वात धाकटे बंधू. त्यांचा जन्म २ मे १९३३ ला झाला. ते वाणिज्य शाखेचे पदवीधर होते आणि चार्टर्ड अकौन्टंट म्हणून त्यांचा खाजगी व्यवसाय नावारुपास आलेला होता. या निमित्ताने त्यांचा जनसंपर्क प्रभावी व विस्तृत होता आणि त्याचा सहजयोगाच्या कार्यासाठी योग्य उपयोग करून घेण्यात ते सदैव तत्पर होते.

बाबामामांकडे संगीताचा वारसा त्यांच्या घराण्यातूनच आला. ते स्वतः तबला व हार्मोनियम वाजवीत आणि गाण्याची कलाही त्यांना अवगत होती. तसेच ते उत्तम कवी होते. त्यांच्या उत्स्फूर्त, भावदर्शी व अर्थपूर्ण कविता व भजने सहजयोग्यांच्या ओठांवर सदैव उमटत. या पार्श्वभूमीवर 'सहज-संगीत' आणि बाबामामा हे एक अतूट नातेच होते आणि सहजसंगीत जोपर्यंत आहे तोपर्यंत त्यांचे नाव चिरंतन स्मरणात राहील.

प. पू. श्रीमाताजींच्या प्रेमपूर्वक आशीर्वादाने व त्यांच्या प्रेरणेमधून स्थापन करण्यात आलेली निर्मल संगीत-सरिता ही कै. बाबामामांनी सहजयोगाला दिलेली एक देणगीच. या संस्थेची संकल्पना कै. बाबामामांना १९८४ च्या सुमारास स्फुरली. संगीत व काव्य या दोन्ही कलांबद्दलची उपजत जाण असल्यामुळेच हे त्यांच्या मनात आले असावे आणि प. पू. श्रीमाताजींच्या आशीर्वादाने ते साकार झाले. कलाकार हेरण्याचे कसब असल्यामुळे त्यांनी गायक-वादक असे निपुण कलाकार मिळवले व सहजयोगाच्या सर्व कार्यक्रमांचा संगीत-सरिता हा एक अविभाज्य घटक झाला. कै. बाबामामांनी त्यासाठी किती कष्ट घेतले १९९४ मध्ये सर सी. पी. श्रीवास्तवसाहेबांनी एका कार्यक्रमात सहज-संगीताची प्रशंसा करताना काढलेले उद्गार – संगीत सरिता आता संगीत सागर झाला आहे. – नेमके दर्शवतात. १९९६ च्या सुमारास नागपूरजवळ संगीत अकॅडेमी स्थापन करण्यात व त्याच्या व्यवस्थेमध्येही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

कै. बाबामामा हे एक अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा सहजयोगकार्याचा हुरुप, कार्यक्रमांचे आयोजन, स्टेजवरून बुलंद आवाजात शेरे-शायरीसोबत केलेले कार्यक्रमाचे संचालन, कलाकारांनी सादर केलेल्या कलेचा गौरव इ. बरोबरच सहजयोग्यांना समर्पण व शरणागतीबद्दल वेळोवेळी केलेले समर्पक मार्गदर्शन अशा त्यांच्या विविध व विशिष्ट छटा सहजयोगी बंधू-भगिनी विसरू शकणार नाहीत. त्या दृष्टीने बाबामामा आमच्यात नसले तरी आम्हा सर्वांच्या स्मरणात कायमचे घर करून राहतील. हीच आमची त्यांच्या स्मृतीला वाहिलेली श्रद्धांजली.

प. पू. श्री माताजींच्या चरण-कमली आपण सर्व सहजयोग्यांनी प्रार्थना करू या की कै. बाबामामांना पुन्हा सहजयोगातच जन्म लाभू दे.

# म्युझिक प्रोग्रॅम प्रतिष्ठान ६ फेब्रुवारी २०००











# शेरे सहज विद्यालय भूमिपूजन समारंभ पुणे ३ मार्च २०००











